# प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण विभाग लातूर

जुने शासकीय विश्रामगृह, जिल्हा सत्र न्यायालयासमोर, लातूर दुरध्वनी क्र.०२३८२ २४४३७८


जा.क्र.प्राउसकवि/लातूर/आस्था/का.१(२)/आनापाना साधना वर्ग/इमारत उपलब्ध/१२.१३/ 1725 दि. २४.५.२०१२

प्रति,

गृहप्रमुख,(युनिट क्र.३)

१००० मुलांचे शासकीय वसतिगृह,

अति.एम.आय.डी.सी.लातूर

विषय:- समाजकल्याण विभागाचे वसतिगृह लातूर येथील A wing मधील ५२ रुम व मध्यवर्ती सभागृह विपश्यना वर्गासाठी देणे बाबत..

संदर्भ:-१) मा.आयुक्त,समाजकल्याण,म.रा.पुणे यांचे परिपत्रक क्र.सकआ/ शिक्षस/ आपा/ दिप/१२.१३/६ दिनांक १८.४.२०१२

२) कोआरडीनेटर,प्रशिक्षण समिती विपश्यना प्रशिक्षण लातूर यांचे पत्र दिनांक २४.५.२०१२

उपरोक्त संदर्भांकित विषयाच्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की संदर्भ क्र.२ अन्वये मित्र उपक्रमांतर्गत विपश्यना वर्गासाठी A wing मधील ५२ रुम व मध्यवर्ती सभागृह मिळणे बाबत या कार्यालयाकडे विनंती केलेली आहे.

समाजकल्याण विभागातंर्गत सर्व जिल्ह्यात वसतिगृहात आणि निवासी शालेमध्ये उन्हाळ्याच्या सुट्टीत शालेय शिक्षक व इतरांसाठी विपश्यना वर्गाचे आयोजन करण्यात येत असून यासाठी समाजकल्याण विभागची वसतिगृहे आणि निवासी शाळा आवश्यकतेप्रमाणे उपलब्ध करुन देण्यात यावे व त्यासाठी आवश्यक असणारे साहित्य उपलब्ध करुन देण्यांबाबत संदर्भ क्र.१ अन्वये आदेशित करण्यात आलेले आहे.

तरी आपण प्रशिक्षण समिती विपश्यना प्रशिक्षण लातूर यांना A wing मधील ५२ रुम व मध्यवर्ती सभागृह तसेच मेसची जागा विपश्यना प्रशिक्षणासाठी उपलब्ध करुन देण्यात यावे तसेच पाणी व विद्युतची व्यवस्था करण्यांत यावी तसेच प्रशिक्षणासाठी कुठलीही अडचण येणार नाही याची दक्षता घ्यावी.

सही/-

प्र.प्रादेशिक उपायुक्त,

समाजकल्याण विभाग,लातूर

प्रतिलिपी,

१) मा.आयुक्त,समाजकल्याण आयुक्तालय,म.रा.पुणे-१ यांना माहितीस्तव सविनय सादर.
२) सहाय्यक आयुक्त,समाजकल्याण,लातूर यांना योग्य त्या कार्यवाहीस्तव.
३) गृहप्रमुख,१००० मुलांचे शासकीय वसतिगृह,युनिट क्र.१ अति.एम.आय.डी.सी.लातूर यांना देवून सुचित करण्यांत येते की,सदर प्रशिक्षणासाठी पाणी व विद्युत व्यवस्थेबाबत अडचण निर्माण होणार नाही याबाबत दक्षता घ्यावी.
४) कोआरडीनेटर,प्रशिक्षण समिती विपश्यना प्रशिक्षण लातूर यांना माहितीस्तव.

प्र.प्रादेशिक उपायुक्त,

समाजकल्याण विभाग,लातूर